स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आंतरविद्याशाखीय समाजकार्य विषयातील विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधन विषय :-

आदिवासी विकासासाठी शासनामार्फत राबवत असलेल्या शैक्षणिक विकास योजनांचा समाजकार्य हस्तक्षेप : विशेष संदर्भ - नांदेड

संशोधक विद्यार्थी :-

श्री. ज्ञानेश्वर बाबुराव साबळे

एम.एस.डब्ल्यू. सेट (M.S.W., SET)

मु.तिरकसवाडी, पोस्ट - शेंबोली, व्हाया - बारड, तालुका - मुदखेड, जिल्हा - नांदेड

Email : dnyanusable88@gmail.com ; मो. :- 9049334017

मार्गदर्शक :-

प्रा.डॉ. डब्ल्यू. आर. मुजावर

प्राचार्य,

जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र सिडको, नांदेड.

E-Mail ID : vrmujawar@yahoo.com

संशोधन केंद्र :-

जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र सिडको, नांदेड.

आदिवासी विकासासाठी शासनामार्फत राबवत असलेल्या शैक्षणिक विकास योजनांचा समाजकार्य हस्तक्षेप : विशेष संदर्भ - नांदेड

प्रस्तावना :-

भारतीय समाज व्यवस्थेत विविध जाती धर्माचे लोक राहतात प्रत्येक जमाती व धर्माची आपापली संस्कृती असते. प्रत्येकाचे सण-उत्सव वेगवेगळे असतात. त्यातील एक जमात म्हणजे आदिवासी समात होय. आदिवासी जमातीची काही वैशिष्ट्ये रुढी व परंपरा दिसून सर्वत्र भारत देशात दिसून येतात. आदिवासी समाज हा भारतातील सर्व राज्यात दिसून येतात. तर भारतात 542 आदिवासी जमाती आहेत. व त्यापैकी महाराष्ट्रात 47 आदिवासी जमाती आहेत. देशात 179 भाषा व 544 बोलीभाषा अस्तित्वात आहेत तर त्यापैकी 116 भाषा व सुमारे चारशे बोलीभाषा आदिवासीच्या आहेत.

देशाच्या सामाजिक दृष्टिकोनातून देशातील सर्वच घटकांना महत्त्व आहे. म्हणून आदिवासी जमातीचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे. परंतु अजूनही भारत देशातील आदिवासी जमातीचा व्हावा तसा सर्वांगीण विकास झालेला नाही, असे दिसून येते. आजही ह्या जमातीमधील लोकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यापैकी कौटुंबिक समस्या, आरोग्य विषय समस्या, शैक्षणिक समस्या व बेरोजगारी समस्या कोणत्या व कशाप्रकारे दिसून येतात, याचा अभ्यास व चिंतन करावा लागणार आहे. यापैकी उदरनिर्वाहाचे स्थिती कशी आहे, शासनाच्या वतीने मिळणाऱ्या योजनांचा लाभ त्यांना मिळतो का? इत्यादी प्रश्नाचे उत्कल करावी लागणार आहे.

समाजात असलेली शैक्षणिक मागासलेपण व त्या दृष्टीने होत असलेले शिक्षण व सोयी सुविधा या सर्व गोष्टी वेळेवर मिळत नसल्यामुळे समाजातील आदिवासी समाजातील बेरोजगारी तसेच शेती प्रधान भारत देश असून भारताचा बराच भाग शेतीवर अवलंबून असला तरी? आजही आदिवासी समाजात शेती ही नसल्याकारणाने व जिथे आहे, तिथे जमिनीची सुपीकता व पाने व इतर बाबीची पूर्तता दिसून येत नाही. परिणामी शासनाने दिलेल्या योजनांचा फायदा व तोटा ‘आदिवासी समाज जीवनावर कितपत पडला याचा विचार ‘अपेक्षित आहे.

भारतीय आदिवासींचा पूर्व इतिहास अभ्यासला असता, हिंदूच्या वैदिक वाङ्मयांना वांग्मयन या जमाती बद्दलचे उल्लेख स्पष्टपणे आढळतात व यातून निश्चितपणे समाजाला हरकत नाही की हे लोक अगोदरच्या काळापासून या वन्य जमाती येथे वस्ती करून राहिल्या होत्या. आज शासन दरबारी आदिवासी समाजाचे आरोग्य विषयक, शेती विषयक, कौटुंबिक, शैक्षणिक घटक दयनीय अवस्था पाहून शासनामार्फत विविध योजनांचा पुरस्कार प्राप्त करून, आदिवासी समाजाचे समस्या सोडवण्यासाठी एक प्रयत्नशीलपणे विकासाकडे पाऊले पडत आहेत.

महाराष्ट्रातील आदिवासी जमाती :-

महाराष्ट्रातील जनतेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्रामध्ये भौगोलिक दृष्ट्या सहा विभागाचे निर्मिती करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग म्हणून ओळखला जातो. तसेच मराठवाड्यात बहुतांश आदिवासी हे हालाकीचे जीवन जगताना दिसून येतात. मराठवाड्यात प्रामुख्याने नांदेड जिल्ह्यात भिल, महादेव कोळी, आंध, गोंड, प्रधान कोलाम व इतर जमातीचा समावेश आहे. 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याचे एकूण लोकसंख्या 11 कोटी 23 लाख 74 हजार 333 एवढी आहे. तर त्यापैकी आदिवासी लोकसंख्या एक कोटी पाच लाख दहा हजार 213 एवढी आहे. एकूण लोकसंख्येचे प्रमाण 9.35 टक्के आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा हा विभाग आदिवासी बहुल मोठा विभाग मानला जातो. तर त्यामध्ये नांदेड हा जिल्हा आदिवासी बहुल म्हणून मोठा मानला जातो. तर मराठवाड्यात आठ जिल्हे असून आठही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी लोकसंख्या दिसून येते. तर त्यापैकी नांदेडमध्ये बऱ्यापैकी सर्वात जास्त संख्या मोठ्या प्रमाणात दिसून येते. तर त्यापैकी लोकसंख्येच्या प्रमाणात नुसार मराठवाड्यात मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातील मुदखेड, अर्धापूर, भोकर, हिमायतनगर, हदगाव, किनवट येथील बेरोजगारी मग त्यामध्ये शैक्षणिक असलेली, शेतीवर आधारलेली, व्यवसायावर आधारलेली, लघुउद्योग, मोठे उद्योगावर आधारलेली, इत्यादी विविध प्रकारचे बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसुन येते व त्यावर शासनाने राबवलेली उपाययोजना कमी करण्यासाठी केलेले उपक्रम हे अपायकारक ठरते. या सर्व बाबींचा विचार करून, आदिवासी समुदायावर शासन दाखवत असलेल्या शैक्षणिक विकास योजनांचा अभ्यास कसा असेल हे क्षेत्र संशोधनासाठी निवडलेले आहे.

आदिवासी (अनुसूचित जमाती Schedule Tribe) कोणास म्हणावे ?

व्याख्या व अर्थ :-

१) गिलीन व गिलीन व यांच्या मते :-

एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणाऱ्या समान बोलीभाषा बोलणाऱ्या, समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या पण अक्षर ओळख नसणाऱ्या स्थानिक गटाच्या माध्यमातून वास्तव्य करणारा समाज म्हणजे आदिवासी समाज होय.

२) डी एन मुजुमदार :-

समान नाव असणारा, एका भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, एकाच बोलीभाषा बोलणारा, विवाह, व्यवसाय इत्यादी बाबतील बाबतील समान नियमाचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करणाऱ्या दृष्टीने पध्दतशीर स्वीकारणाऱ्या कुटुंबाचे किंवा कुटुंब संग्रहाचे एकीकरण म्हणजेच आदिवासी समाज होय.

वरील व्याख्येवरून आदिवासी समाजाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये लक्षात येतात. प्रस्तुत अध्ययनात आदिवासी समाज आणि त्यांच्यासाठी केंद्र सरकारचे निर्देश, केंद्रशासन व राज्य शासन यांच्यामार्फत आदिवासी विकासाच्या योजना व त्यांची फळश्रूती किती प्रमाणात झाली? हे अभ्यासण्यासाठी आदिवासी विकासासाठी शासनामार्फत राबवत असलेल्या शैक्षणिक विकास योजनांचा समाजकार्य हस्तक्षेप : विशेष संदर्भ – नांदेड जिल्हा हा विषय अध्ययनासाठी निवडला आहे.

समस्या सूत्रन :-

"आदिवासी विकासासाठी शासनामार्फत राबवत असलेल्या शैक्षणिक विकास योजनांचा समाजकार्य हस्तक्षेप" : विशेष संदर्भ – नांदेड जिल्हा या संशोधन विषयात सर्वसामान्यपणे आदिवासी महिलांचा व पुरुषांचा ग्रामीण, शहरी, शेतीविषयक, शैक्षणिक, राजकीय, औद्योगिक स्थितीचा आढावा घेणे त्यांच्या विविध समस्याचे अवलोकन करणे, तसेच त्यांच्यासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी कार्यक्रमाचे मूल्यमापन करणे या संशोधनात अपेक्षित आहे.

आज आपण 21 व्या शतकाकडे वाटचाल करीत असलो तरी? आदिवासी समाज हा इतर समाजापासून विकासाच्या लाभांपासून लाखो दूर असलेल्या दिसून येतो. भारतामध्ये तसेच महाराष्ट्रातील विविध विभागात आदिवासी समाजाचे वास्तव्य असल्याने? विविध नदी खोऱ्यात असल्याने त्यांच्या इतर जगाशी संपर्क फार कमी दिसून येतो. त्यांच्या अनेक प्रकारचे मूळ ही घाव वस्तुस्थितीला आहे. त्यामुळे या समाजातील बेरोजगारी व इतर समस्या प्रकरपणे दिसून येतात.

स्वातंत्र्योत्तर काळात 1951 पासून आर्थिक विकास साधण्यासाठी भारतात नियोजनबद्ध विकास कार्याला प्रारंभ झाला व पंचवार्षिक तसेच वार्षिक नियोजनातून शैक्षणिक, वैज्ञानिक, औद्योगिक, प्रगतीमुळे व सामाजिक शैक्षणिक व आर्थिक संरचनेत परिवर्तन होत गेले. हे नाकारता येत नाही. परंतु या परिवर्तनाच्या प्रक्रियेत भारतीय समाजातील आदिवासी समाजाचे फारशी प्रगती झालेली दिसून येत नाही. यासाठी आदिवासी समाजातील 'आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, उन्नतीचे मूल्यमापन करण्यासाठी व त्यावर उपाययोजना सुचवण्यासाठी संशोधन विषयात विविध समस्याचे आकलन केले जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने शासकीय योजनांचा वापर तसेच त्यावर प्रशासन व योजनांचे कार्यवाही अधिक प्रभावी करण्यासाठी कोणत्या सुधारणा केल्या पाहिजे? अशा प्रकारे अनेक प्रश्नांचे उत्तर शोधण्याचा या संशोधनातून प्रयत्न करणे अपेक्षित आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

कोणत्याही विषयाचे अध्ययन करण्यासाठी निश्चित अशी दिशा प्राप्त होणे आवश्यक असते. आणि त्यासाठी संबंधित विषयाच्या अध्यपनाचे उद्दिष्टे निश्चित केली आहेत. त्याप्रमाणे संशोधकाने "आदिवासी विकासासाठी शासनामार्फत राबवत असलेल्या शैक्षणिक विकास योजनांचा समाजकार्य हस्तक्षेप" : विशेष संदर्भ – नांदेड जिल्हा या अध्ययन विषयाचे उद्दिष्टे खालील प्रमाणे समाज कार्याच्या माध्यमातून निश्चित केली आहेत.

1) आदिवासी समाजातील विकास योजनांमुळे शैक्षणिक स्तरात झालेल्या बदलांचा अभ्यास अभ्यासणे.

2) आदिवासी शैक्षणिक विकास योजनांमुळे आदिवासी समाजाच्या उदरनिर्वाहाच्या साधनांमध्ये झालेल्या विकासाचा अभ्यास अभ्यासणे.

३) आदिवासी शैक्षणिक विकास योजनांमुळे नेतृत्व गुणात झालेल्या विकासाचा अभ्यास करणे.

४) आदिवासी समाज समुदाय संघटनेत विकास योजनेमुळे झालेल्या विकासाचा अभ्यास करणे.

५) आदिवासी समाजासाठी असलेल्या शैक्षणिक विकासा योजना लाभार्थ्यां पर्यंत पोहचणेसाठी शासकीय यंत्रणेने केलेल्या प्रयत्नाचा अभ्यास करणे.

अध्ययनाची गृहीतकृत्ते :-

कोणत्याही अध्यापन विषयाचे संशोधकाला वैज्ञानिक पद्धतीने अध्यापन करावे लागते. यासाठी संशोधकाला त्या विषयाचे पुर्वज्ञान व अनुभव असावा लागतो आणि या अनुभवाच्या आधारे संशोधक संशोधन विषयासंबंधी गृहीत कृत्ते निश्चित करत असतो, हे अनुभव संशोधकाला संशोधन कार्यासाठी मार्गदर्शक ठरत असतात. संबंधित विषयाच्या संशोधनासाठी संशोधकाने पुढील प्रमाणे गृहीतकृत्ते निश्चित केलेली आहेत.

1) आदिवासी विकासासाठी असलेल्या शैक्षणिक योजनांमुळे आदिवासी विदयार्थ्यांचा विकास झालेला दिसत नाही.

२) आदिवासी शैक्षणिक विकासासाठी उदरनिर्वाहाच्या योजना आदिवासींपर्यंत पोहचलेल्या नाहीत.

३) आदिवासी शैक्षणिक विकासासाठी अदिवासी लोकांमध्ये नेतृत्व कौशल्य विकसित झालेले नाहित.

४) आदिवासी शैक्षणिक विकासासाठी आदिवासी समुदायात सामाजिक संघटन विकास झालेले नाही.

५) आदिवासी शैक्षणिक विकासासाठी आदिवासीपर्यंत शासकीय कर्मचारी कमी पडलेले दिसतात.

संशोधन विषयाची निवड व महत्व :-

राज्यातील दुर्लक्षित असलेल्या आदिवासी समाजाचे आर्थिक उन्नती व्हावी या उद्देशाने तसेच राज्यातील आदिवासी समाजातील वाढती शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, औद्योगिक व इतर विषयातील वाढती उन्नती होण्यासाठी व सामाजिक प्रगती होण्यासाठी शासनाने राबवित असलेल्या उपाययोजनांचा अभ्यास होणे अपेक्षित आहे. तसेच राज्यात महाराष्ट्र शासनाने शबरी आदिवासी महामंडळ योजना हा उपक्रम सुरू केला आहे. तसेच आदिवासी विभागामार्फत विविध योजनांची अंमलबजावणी केली जाते. तसेच इतर राज्य सरकारचे शैक्षणिक व औद्योगिक सहायताप्राप्त होते. विविध योजनांचा लाभ घेतल्यामुळे त्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीमध्ये बदल झाला आहे का? याचे एकंदरीत विषयांच्या अनुषंगाने अध्ययन होणे गरजेचे आहे.

तसेच आदिवासी समाजातील लोकांना कोणकोणत्या योजना दिल्या जातील आदिवासी समाजातील व्यक्तींना त्यांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी काय काय करता येईल, जेणेकरून ग्रामीण भागात शासकीय योजना वाढवता येतील व विशेषता दुर्गम आदिवासी भागातील व्यक्तींच्या जीवनात सुधारणा घडवून आणणे शक्य होईल का? व बेरोजगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन राबवत असलेले उपक्रम विविध ....योजनांचा परिणाम कितपत लागू पडतो या उद्देशाने "आदिवासी विकासासाठी शासनामार्फत राबवत असलेल्या शैक्षणिक विकास योजनांचा समाजकार्य हस्तक्षेप" : विशेष संदर्भ – नांदेड जिल्हा मार्फत हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधन पद्धती :-

"आदिवासी विकासासाठी शासनामार्फत राबवत असलेल्या शैक्षणिक विकास योजनांचा समाजकार्य हस्तक्षेप" : विशेष संदर्भ – नांदेड जिल्हा या विषयाच्या संशोधनाच्या विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल. तसेच विश्लेषणात्मक संशोधन पद्धती उपलब्ध असणाऱ्या आधार सामुग्रीवर आधारित विश्लेषण करण्यात येईल. याचबरोबर उपलब्ध माहितीचे टीकात्मक परीक्षण करण्यात येईल व बेरोजगार आणि त्यावर उपाययोजनांचे शासन राबवत असलेल्या घटनात्मक प्रश्नावली अंतर्गत अभ्यास करण्यात येईल.

संशोधनाचे शीर्षक :-

"आदिवासी विकासासाठी शासनामार्फत राबवत असलेल्या शैक्षणिक विकास योजनांचा समाजकार्य हस्तक्षेप" : विशेष संदर्भ – नांदेड

संशोधनाचे स्वरूप :-

संशोधनाचे स्वरूप हे सामाजिक शास्त्र पद्धतीचे असेल या संशोधनातून नमुना निवड पद्धतीचा वापर असेल, तसेच प्राथमिक व द्वितीय स्त्रोताचा वापर या अध्ययनासाठी करण्यात येईल.

संशोधनाचे महत्त्व :-

प्रस्तुत संशोधन नव्याने असून नमुना निवड पद्धतीने अभ्यास करून, "आदिवासी विकासासाठी शासनामार्फत राबवत असलेल्या शैक्षणिक विकास योजनांचा समाजकार्य हस्तक्षेप" : विशेष संदर्भ – नांदेड स्थितीचे अध्ययन करून त्यावर शासन राबवत असलेल्या योजनांचा अभ्यास करून महत्वपूर्ण निष्कर्ष काढण्यात येणार आहेत. व पूरक अशा शिफारशी करण्यात येणार आहेत. त्यामुळे समाजातील उन्नती व प्रगतीसाठी केंद्र सरकार, राज्य सरकार व जिल्हा प्रशासन या आदिवासी विकास योजना राबविताना महत्त्वाचा ठरेल. तसेच संशोधन व संशोधन करणाऱ्या विद्यार्थी, संशोधक, संस्था, खाजगी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, विविध सामाजिक संस्था, राजकीय नेते यांना संशोधनाचा उपयोग होईल यासाठी या संशोधनाचे महत्त्व आहे.

संशोधन आराखडा :-

प्रस्तुत संशोधनात संशोधकाला आदिवासी समाज जीवनावर राबवत असलेल्या शैक्षणिक विकास योजनांचा समाजकार्य हस्तक्षेप विषयाचा अभ्यास करावयाचा होता म्हणून संशोधकाने संशोधन करण्यासाठी विश्लेष्णात्मक आराखडयाची निवड संशोधनात संशोधन कर्त्याला संशोधन आराखडा तयार करणे आवश्यक आहे. ज्या संशोधनात संख्यात्मक माहिती संशोधनातून प्राप्त होते अशा वेळी विश्लेष्णात्मक आराखडा वापरला जातो.

नमुना निवड पद्धत :-

समुहाच्या सर्व सदस्याऐवजी त्यांच्यातील एक प्रतिनिधी निवडून त्यांच्याशी संपर्क साधून माहिती गोळा करणि ती माहिती संपूर्ण समुहाची अथवा सामग्रीची आहे या पद्धतीला नमुनानिवड पद्धत असे म्हणतात.

प्रस्तूत संशोधनात शास्त्रशुद्ध पद्धतीने व वेळेत पूर्ण करण्यासाठी संशोधकाने संभाव्यता नमुनानिवड या पद्धतीचा वापर केलेला आहे ही पद्धत निवडण्याचे कारण म्हणजे आदिवासी समाजातील सर्व लाभार्थी नारिक यांना शासकीय योजनांचा फायदा किंवा लाभ हे प्राप्त झाले किंवा नाही यासाठी सर्व लाभार्थी लोकांना समान प्रतिनिधीत्व मिळावे याची काळजी घेतलेली आहे. तसेच नमुना निवड एकूण उत्तर दात्ते 300 एकक नमुना निवड करण्यात आले आहे.

अध्ययन क्षेत्राशी निगडीत असणारे सर्व लाभार्थी आदिवासी प्रकल्प, Z.P. प्रकल्प संशोधक, खाजगी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संस्था, राजकीय नेते इत्याठी घटकांचा अध्ययनासाठी वापर घेण्यात येईल.

थोडक्यात आदिवासी समाजातील विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी आदिवासी समुदायात व्यक्तिमत्व, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, शैक्षणिक विकासात भर पडते का याची माहिती संकलन करण्यासाठी संशोधकाने संभाव्यता नमुना निवड पद्धतीचा वापर करून प्राथमिक तथ्य संकलन करण्यात आले.

अध्यापनाच्या मर्यादा :-

प्रस्तुत अध्ययन प्राथमिक व द्वितीय सामग्री वर आधारित आहे. वेगवेगळ्या पद्धतीने संकलित केलेले शासकीय आकडेवारी, आकडेवारी शासकीय गोपनीय व उपलब्ध असलेल्या अपूर्ण माहितीमुळे सामग्री संतुलनावर मर्यादा पडतात. काही वेळेस डोंगराळ भागातील आदिवासी लोकांकडून आवश्यक आवश्यक ती माहिती उपलब्ध होणार नाही. ही माहितीच्या अपुरेपणाची मर्यादा राहील. तसेच शासकीय कार्यालयातून होणारी माहितीची उपलब्धतेची टाळाटाळ हि पण अपुरेपणाची मर्यादा राहील.

संशोधनाचे अभ्यास क्षेत्र व्याप्ती :-

"आदिवासी विकासासाठी शासनामार्फत राबवत असलेल्या शैक्षणिक विकास योजनांचा समाजकार्य हस्तक्षेप" : विशेष संदर्भ – नांदेड जिल्हा या संशोधन विषयाचा अभ्यास करण्याकरता मराठवाडा विभागातील विशेष नांदेड जिल्ह्यातील मुदखेड, अर्धापूर, भोकर, हदगाव, हिमायतनगर, किनवट अशा सहा तालुक्यातील आदिवासी बहुल लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यातील व तालुक्यातील आदिवासी विकास योजनांची संबंधित निवडक लाभधारकापुरतीच मर्यादा मर्यादित राहील.

तथ्य संकलन :-

गुणात्मक संशोधनाच्या आधारे संबंधित विषयासाठी माहिती गोळा केली जाणार आहे तसेच प्राथमिक साधनांमध्ये मुलाखत अनुसूचि व निरीक्षण या तंत्राचा वापर करणार आहे. दुय्यम स्त्रोतामध्ये वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके, शोधनिबंधे, प्रकाशित व ‘अप्रकाशित साहित्य, जनगणना अहवाल नांदेड जिल्हा गॅझेट, महाराष्ट्र राज्य गॅझेट, महाराष्ट्र शासनाचे विविध प्रकाशने, महाराष्ट्र राज्याची सांख्यिकीय घोषवारा, ‘आदिवासी विकास आयुक्तालया मार्फत प्रकाशने, ‘अहवाल आदिवासी विकास मंत्रालयाचे नविन निर्णय, ‘आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांचे संशोधन ‘अहवाल, विदयापीठ ग्रंथालयातील संशोधित साहित्य, वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, इंटरनेट, इत्यादी माहितीचा उपयोग संशोधनासाठी करण्यात येणार आहे.

प्रकरणाची रचना :-

प्रकरण पहिले

१) प्रस्तावना.

२) साहित्य पुर्नवलोकन.

प्रकरण दुसरे

१) संदर्भ साहित्याचा आढावा.

प्रकरण तिसरे

1) समाजकार्य संशोधन आराखडा.

2) आदिवासी समाजाची पार्शवभूमी.

प्रकरण चौथे

1) तथ्यांचे संकलन व विश्लेषण.

प्रकरण पाचवे

1) निष्कर्ष, सारांश, गृहीतकृत्याची पडताळणी.

2) समाजकार्य प्रारूप व सूचना.

परिशिष्टये...

1] संदर्भ ग्रंथ सूची

2] मुलाखत अनुसूची

संदर्भ सूची :-

1) फु.ल. भांडारकर, सामाजिक संशोधन पद्धती महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर 1976.

२) प्रभाकर भांडे भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद 2003.

३) गोविंद गारे, आदिवासी शिक्षण, संकेत प्रकाशन, औरंगाबाद 2009.

४) गोविंद गारे, पैनगंगा नदीच्या खोऱ्यातील अंध आदिवासी, श्री विद्या प्रकाशन पुणे 2001.

५) सुदर्शन देशमुख, आदिवासी समाजातील दारिद्र्य निर्मूलन, निर्मल प्रकाशन नांदेड 2007.

६) गोविंद गारे 2000 महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 2000.

७) यशवंत चावरे, अनुसूचित जाती, जमातीचे कल्याण व संरक्षण कायदे आणि त्यांची अंमलबजावणी मनोविकास प्रकाशन पुणे 2009.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.डब्ल्यू. आर. मुजावर

(M.S.W., SET, Ph.D., D.L.L, L.L.B.,)

EMAIL : vrmujawar@yahoo.com

Mo. No. 9823275570

प्राचार्य

जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय

व संशोधन केंद्र सिडको नांदेड.

संशोधक विद्यार्थी

ज्ञानेश्वर बाबुराव साबळे

एम.एस.डब्ल्यू / सेट (समाजकार्य)

Email - dnyanusable88@gmail.com